# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय

प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

**ई-मेल :** pro@mahagenco.in

क्र. : सां.नि. व सु./जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/२९/३४ दिनांक : २३/०२/२०२२.

**<u>वृत्तपत्रीय निवेदन</u>**

**महानिर्मिती तर्फे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय विविध खुल्या स्पर्धांचे आयोजन**

**(दि. १४ फेब्रुवारी २०२२ - मुंबई) :** महानिर्मिती ही एन.टी.पी.सी. नंतर दुसऱ्या क्रमांकाची शासकीय वीज निर्मिती करणारी कंपनी आहे. महानिर्मितीची वीजनिर्मिती स्थापित क्षमता एकूण १२,९७२ मेगावॅट इतकी असून उर्जा निर्मितीच्या क्षेत्रात औष्णिक, जल, वायु तसेच सौर ऊर्जेद्वारे वीज निर्मिती करण्यात येते. सामाजिक उत्तरदायित्वाच्या जाणिवेतून स्पर्धात्मक दरात महाराष्ट्र राज्यासाठी सातत्याने पुरेशी वीज निर्मित्ती करणे या ध्येयाने महानिर्मिती राज्यातील वीज ग्राहकांकरिता वीज निर्मिती करते. कोरोना आपत्ती काळात महानिर्मितीने विपरीत परिस्थतीत देखील सातत्याने वीजनिर्मिती करून राज्याची विजेची गरज भागविण्यात मोलाची कामगिरी केली व औष्णिक विद्युत केंद्रानजीकच्या परिसरात ऑक्सिजन प्लांट्स उभारून आपल्या सामाजिक बांधिलकीचा देखील प्रत्यय दिला.

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त **"आजादी का अमृत महोत्सव"** संकल्पना साकार करण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन यांच्या निर्देशानुसार महानिर्मितीतर्फे विविध स्पर्धात्मक उपक्रम राबविले जात आहेत. या अंतर्गत विविध खुल्या राज्यस्तरीय स्पर्धांची घोषणा करण्यात येत आहे. यामध्ये खाली नमूद केलेल्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहेत.

१) **<u>राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धा</u> :- विषय : पर्यावरण संवर्धन / अपारंपरिक उर्जा**
**माध्यमिक गट ( इयत्ता ७ वी ते १० वी ) - बक्षिसे :** प्रथम क्रमांक (रु १०,०००/-) द्वितीय क्रमांक (रु ५,०००/-) व तृतीय क्रमांक (रु ३,०००/-)
**खुला गट - बक्षिसे :-** प्रथम (रु. २५,०००/-), द्वितीय (रु. १५,०००/-) तसेच तृतीय (रु. १०,०००/-)

२) **<u>राज्यस्तरीय संशोधनात्मक निबंध स्पर्धा</u> :- विषय : वीज क्षेत्रातील अभियांत्रिकी स्थित्यंतरे / नवीन व नवीकरणीय अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रामधील अभिनव संशोधन (फक्त अभियांत्रिकी पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांसाठी) -**
**बक्षिसे :-** प्रथम (रु. ३०,०००/-), द्वितीय (रु. २०,०००/-) तसेच तृतीय (रु. १०,०००/-)

३) **राज्यस्तरीय खुली लघुपट / दर्जेदार मोबाईल क्लिप निर्मिती स्पर्धा :- (कालावधी मर्यादा ५ मिनिट)**
**(विषय - राष्ट्रनिर्मितीत महिलांचे योगदान / ऊर्जेचे अपारंपरिक स्त्रोत- नव संकल्पना / ऊर्जा आणि मानव)**
**बक्षिसे :-** प्रथम (रु. ३०,०००/-), द्वितीय (रु. २०,०००/-) तसेच तृतीय (रु. १०,०००/-)

वरील सर्व स्पर्धांसाठी प्रवेशिका सादर करण्याची **अंतिम मुदत १५ एप्रिल २०२२ रोजी** असून राज्यातील अधिकाधिक स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवून स्पर्धा यशस्वी करण्याचे आवाहन महानिर्मितीतर्फे करण्यात आले आहे. या स्पर्धांबाबत सविस्तर माहिती तसेच नियम व अटी याकरिता महानिर्मितीचे संकेतस्थळ www.mahagenco.in येथे Latest Announcement मध्ये अथवा akamrut@mahagenco.in या ई-मेल वरती संपर्क साधावा असे महानिर्मितीचे मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. महेश आफळे यांचेद्वारे आवाहन करण्यात आले आहे.

---

दिनांक : २३/०२/२०२२.

प्रति,
**मा. संपादक**
**दैनिक / वृत्तवाहिनी**

आदरणीय महोदय / महोदया,
कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तींत / वाहिनीवर प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.
धन्यवादासह,

आपले स्नेहांकित,

**(महेश आफळे)**
**जनसंपर्क अधिकारी, महानिर्मिती**